**मटा अँकर** ‘महाराष्ट्र टाइम्स’च्या ‘सगुण निर्गुण’ या पुस्तकाचे प्रकाशन

# सोप्या शब्दांत अध्यात्माची अनुभूती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अध्यात्म म्हणजे गहन अवघड विषय, अध्यात्म लेखन म्हणजे जड शब्द असे समज दूर करून संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे व डॉ. यशवंत पाठक यांनी अध्यात्माची संकल्पना सोप्या शब्दांत उलगडली.

निमित्त होते ‘सगुण निर्गुण’ या पुस्तकाच्या प्रकाशनाचे. संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे व डॉ. यशवंत पाठक यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशित करण्यात आले. ‘महाराष्ट्र टाइम्स’मध्ये गेल्या तेरा वर्षांपासून संपादकीय पानावर प्रसिद्ध होत असलेल्या ‘सगुण-निर्गुण’ या स्तंभातील निवडक लेखांचे संकलन पुस्तकरूपात उपलब्ध होणार आहे. या मालेतील पहिल्या पुस्तकाचे मंगळवारी पुण्यात आणि मुंबईत प्रकाशन झाले. मुंबईत महाभारताचे भाष्यकार दाजी पणशीकर यांच्या हस्ते ‘सगुण निर्गुण’ या पुस्तकाची पहिली प्रत श्री सिद्धिविनायकाच्या चरणी अर्पण करण्यात आली.

पुण्यातील कार्यक्रमात प्रा. पाठक म्हणाले, ‘सगुण निर्गुण हे सदर संत साहित्याशी थेट निगडित नाही; तर अध्यात्माची वैयक्तिक अनुभूती त्यातून मांडली जाते. संत साहित्य हे कधी भूतकाळात जगले नाही. त्याने कायमच वर्तमानकाळाची नस पकडली. संत वर्तमानकाळात जगले. ज्यांच्याकडे काही सांगण्यासारखे नाही, ते भूतकाळात जगतात. त्यामुळे सगुण निर्गुण या प्रवृत्ती आहेत. कोणतेही तत्त्वज्ञान थेट वरून येत नाही. त्याला वैयक्तिक अनुभवाची जोड लागते. अनुभव हाच श्रेष्ठ गुरू असतो. निर्गुण तत्त्व म्हणजे जगण्यापलीकडील अज्ञात विश्वाच्या व्यवस्थेतील आंतरऋणानुबंध असतात. आपल्याकडे संतांना पोथ्यांमध्ये जखडून टाकले आहे. सगुण निर्गुण या सदराने जगण्याचा अनुबंध घट्ट करण्याचे काम केले.’

डॉ. देखणे म्हणाले, ‘साहित्याच्या दृष्टीने शब्द हे शरीर असतात. विचारतत्त्व हे सौंदर्य असते. तर चिंतन हा आत्मा असतो. हे पुस्तक म्हणजे आत्माशी असलेला संवाद आहे. विचारतत्त्व शब्दांच्या सौंदर्याने नटते. अध्यात्म हे अवघड नसते. सोपी भाषा व पेलणारे अध्यात्म या सदरातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले. अध्यात्म हे जीवनदर्शन झाले पाहिजे. या पुस्तकामुळे लावण्यदर्शन हाती आले आहे. या विषयावरील पुस्तक प्रकाशित करण्याच्या ‘मटा’च्या धाडसाचे कौतुक केले पाहिजे,’ असे त्यांनी सांगितले.

‘महाराष्ट्र टाइम्स’च्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक पराग करंदीकर यांनी प्रास्ताविक केले. मुख्य उपसंपादक मंगेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

>> अक्षर जाहले ‘सगुण-निर्गुण’...१३

## ‘मटा’शी घट्ट अनुबंध

डॉ. पाठक व डॉ. देखणे या दोघांनीही ‘मटा’ पूर्वीपासूनच घट्ट अनुबंध असल्याचे सांगत आठवणींना उजाळा दिला. माझा आणि ‘मटा’चा ऋणानुबंध खूप पूर्वीपासूनचा आहे. रविवार पुरवणी आणि दैनंदिन अंकातून मटा नेहमीच वैचारिक खाद्य देत आल्याचे डॉ. पाठक यांनी सांगितले; तर सगुण निर्गुण सदराचे लेखक अशी ओळख अनेक ठिकाणी करून दिली जायची, असे डॉ. देखणे यांनी सांगितले.




स्वप्नील शिंदे

‘महाराष्ट्र टाइम्स’मधील ‘सगुण निर्गुण’ या सदरातील निवडक लेखांचा समावेश असलेल्या याच शीर्षकाच्या पुस्तकाचे प्रकाशन संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे व डॉ. यशवंत पाठक यांच्या हस्ते पुण्यात टाइम्स हाउसमध्ये नुकतेच करण्यात आले.

## पुस्तक उपलब्ध

‘सगुण निर्गुण’ या सदरात आतापर्यंत शंभरहून अधिक लेखकांनी लेखन केले आहे. ‘मटा’च्या सदराचे पुस्तक करण्याचा पहिलाच प्रयोग आहे. शंभर लेखांचे एक, अशी तीन पुस्तके प्रकाशित केली जाणार आहेत. ॲमेझॉन, बुकगंगा या वेबसाइट्ससह प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे हे पुस्तक उपलब्ध होणार आहे.